दैनिक
सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १४० • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.१९ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज
यांच्या जयंती निमित्त
हार्दिक शुभेच्छा....!
-संपादक

कितीही रडारड केली तरी 'बापचोर, 'गद्दार' टॅग पुसला जाणार नाही-आदित्य ठाकरे

मुंबई–युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या टीकेला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. कितीही रडारड केली तरी तुमच्यावर असलेला गद्दार आणि बापचोर हा टॅग कधीच पुसली जाणार नाही असे आदित्य ठाकरे म्हणाले. तसेच राहुल गांधी यांना पंतप्रधान बनायचं असेल तर, त्यांनी भाजपामध्ये जावे कारण तिथे सर्व काँग्रेसचे नेते आहेत असा सल्ला आदित्य ठाकरेंनी राहुल गांधींना दिला आहे. महा निष्ठा, महा न्याय, महाराष्ट्राच्या माध्यमातून मुंबईत लालबाग विभाग क्रमांक ११ येथे आदित्य ठाकरे यांची तोफ धडाडली. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री शिंदेंसह भाजपला अनेक मुद्द्यांवरून लक्षय केले. या सभेला शिवसैनिक आणि मुंबईकरांनी मोठी गर्दी केली. संपूर्ण लालबाग शिवसैनिकांच्या घोषणांनी दणाणून गेला होता.

सभेला उपस्थित शिवसैनिकांना संबोधित करताना आदित्य ठाकरे यांनी सरकारच्या नाकर्तेपणावर सडकून टीका केली. ''सध्याचं सरकार केवळ इतिहासात काय झालं त्यात अडकून पडले आहे. आपण भविष्यावर काम करणारी लोकं आहोत, पण सध्याचे सरकारकडून सगळे उद्योग गुजरातमध्ये पाठवले जात आहेत. या सरकारची फक्त टॅगलाइन बदलत असते मात्र परिस्थिती तीच राहते. 'अब की बार ४०० पार आणि वैगरे वैगरे. फक्त निवडणुका आल्या की, घोषणा बदलतात'', असे म्हणत सरकारला आदित्य ठाकरे यांनी धारेवर धरले.यावेळी त्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्या टीकेला सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे. ''गद्दारांनी आता सुद्धा काहीतरी रडारड केली. पण तुमच्यावर असलेली गद्दार आणि बापचोर ही टॅगलाइन कधीच पुसली जाणार नाही. प्रकल्प गुजरातला पळवले जात आहेत, मुंबईच्या रक्तारक्तात क्रिकेट असताना वर्ल्डकप फायनल गुजरातला झाली. पण महाराष्ट्राच्या विकासाशी सरकारला देणं घेणं नाही'', असे आदित्य ठाकरे म्हणाले.केंद्रीय आस्थापनांच्या दबावतंत्रावर बोलताना आदित्य ठाकरे यांनी मुंबईकरांना आवाहन करताना म्हटलं की, ''आज या गद्दारांच्या विरोधात किशोरी पेडणेकर, राजन साळवी, सूरज चव्हाण लढत आहेत. संजय राऊत तर जेलमध्ये जाऊन आले, आता तर ते कोणाला घाबरत नाहीत. दबाव टाकण्याचा प्रयत्न सुरू आहे. केंद्रीय संस्थांचा वापर केला जात आहे. उद्या तुमच्या घरीसुद्धा त्यांचे एऊ, उइख घेऊन येतील. पण आपण घाबरायच नाही. 'आपण एक होऊन मुंबईकर होऊन लढायच आहे'', असे ते म्हणाले.पहूही आदित्य ठाकरे म्हणाले, ''मला तर भाजपाच्या कार्यकर्त्यां विषयी वाईट वाटत आहे. कारण आता ज्या काही नेत्यांना पद दिले आहेत, त्यातले अनेक बाहेरचे आहेत. मी तर राहुल गांधी यांना सल्ला देईन की, तुम्हाला पंतप्रधान बनायचं असेल तर, तुम्ही भाजपामध्ये जा. कारण तिथे सर्व काँग्रेसवालेच आहेत. आता भाजपचा नारा बदलला आहे 'दाग अच्छे है', वाशिंग पावडर भाजपा' ही भाजपची नवीन टॅगलाईन आहे. कारण जेवढे गद्दार भ्रष्टाचारी आहेत, ते सर्व भाजापामध्ये आहेत'', असे आदित्य ठाकरे म्हणाले.

शंकरपूर मध्ये ईव्हीएम डेमो प्रात्यक्षिकला नागरिकांचा विरोध

चिमूर । प्रतिनिधी

चिमूर तालुक्यात निवडणूक आयोगामार्फत ईव्हीएम मशीन कशी योग्य आहे हे नागरिकांना दाखवण्यासाठी डेमो मशीन द्वारे गावागावात प्रात्यक्षिक नागरिकांना दाखवल्या जात आहे. त्यामधून नागरिकांना मतदान कसे करायचे तसेच ईव्हीएम मशीन बाबत माहिती व आपण दिलेले मतदान हे आपल्याच उमेदवाराला कसे प्राप्त होते.याबाबत सविस्तर माहिती देऊन त्यावर नागरिकांच्या सह्या घेण्यासाठी हे पथक गावागावांमध्ये फिरत आहे.

अशीच माहिती देण्याकरता शंकरपूर येथे गेल्या सोमवारी बाजारच्या दिवशी शिवाजी चौक येथे हे पथक दाखल झाले होते. परंतु तेव्हा नागरिकांनी हे डेमो प्रात्यक्षिक दाखविण्यास निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांना विरोध केला होता व उपस्थित नागरिकांनी कोणती ही सही न करता हे पथक वापस पाठविले, तरीही दिनांक १७ फेब्रुवारीला पुन्हा हे पथक शंकरपूर ग्रामपंचायत लगत व बस स्टॉप लगत आपल्या ईव्हीएम मशीन चा डेमो दाखवण्यासाठी आले. ते पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली परंतु पंचायत समितीचे सदस्य रोशन ढोक, शंकरपूर ग्रामपंचायतचे सरपंच साईस वारजूकर, ग्रामपंचायत सदस्य तसेच गावातील नागरिकांनी निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांना विरोध केला. आपण हा डेमो कशासाठी दाखवत आहे. सत्ताधारी पक्षांनी निवडणूक आयोगाला विकत घेतले आहे. या मशीन द्वारे कशा पद्धतीने मतदानाचा घोळ होतो हे प्रत्येक नागरिकाला माहिती आहे. आपण नागरिकांच्या सह्या घेऊन जनतेला फसवत आहात कारण समोरील निवडणुकीपासून ईव्हीएम मशीन द्वारे मतदान करण्यासाठी नागरिकांचा विरोध आहे. बऱ्याच वर्षापासून नागरिक या मशीनद्वारे मतदान करीत आहेत.त्यामुळे यावेळी निवडणूक आयोगामार्फत प्रात्यक्षिक दाखवणे म्हणजेच नागरिकांमध्ये निवडणूक आयोगाबद्दल संभ्रम निर्माण करणारी आहे. आणि याबाबतचे केस सुप्रीम कोर्टात सुरू आहे. मोदी सरकार ही ईव्हीएम मशीन किती योग्य आहे हे पटवून देण्यासाठी नागरिकांना फसवून त्यांच्या सह्या घेऊन सुप्रीम कोर्टात नागरिकांच्या स्वाक्षऱ्या सादर करून जनतेचा विरोध असतानाही जनता आपल्या सोबत आहे हे दाखविण्याचा प्रयत्न करीत आहे. हे सिद्ध होत आहे. आपण प्रात्यक्षिकाचे निमित्य दाखवून भाजपाचा प्रचार करीत असल्याचा आरोप यातून नागरिकांनी केला.

शेवटी निवडणूक अधिकाऱ्यांनी कोणत्याही प्रश्नाचे उत्तर न देता व कोणतेही प्रात्यक्षिक न घेता शंकरपूर मधून काढता पाय घेतला.यापलीकडे चिमूर तालुक्यातील कोणत्याही गावांमध्ये अशा प्रकारचे ईव्हीएम मशीन चे प्रात्यक्षिक दाखवण्यात आल्यास त्यावर नागरिकांनी सह्या करू नये अशी आव्हानही पंचायत समिती सदस्य रोशन ढोक तसेच शंकरपूर ग्रामपंचायतचे सरपंच साईस वारजूकर यांनी केले.

चिमूर तालुक्यात भाजपला खिंडार

भाजपा नेते विवेक कापसे यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

चिमूर । प्रतिनिधी

राज्यात काही नेते हे ईडी सीबीआय ला घाबरून भाजपामध्ये प्रवेश करीत असले तरी भाजपाच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे व भाजपा नेत्यांच्या जुमलेबाजीमुळे व त्यांच्या मनमानी कारभारामुळे पक्षातील बरेच ग्रामीण कार्यकर्ते व नेते त्रासलेले आहेत. त्यामुळे ग्रामीण परिसरात दिवसेंदिवस भाजपाला खिंडार पडत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

अशा विविध कारणामुळे भाजपा नेते तथा ग्रामपंचायत सदस्य नवेगांव पेठ विवेक कापसे यांनी महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्ष नेते विजयजी वडेट्टीवार यांच्या हस्ते भाजपाला रामराम ठोकून कांग्रेस पक्षाचा दुपट्टा टाकून कांग्रेस पक्षात प्रवेश केला.

या वेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्वयक चिमूर विधानसभा डॉ. सतिश वारजुकर, महाराष्ट्र प्रदेश ओबीसी संघटक धनराज मुंगले, चंद्रपूर जिल्हा काँग्रेस कमिटी सरचिटणीस गजानन बुटके, चिमूर तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष डॉ. विजय गावंडे पाटील, सेवादल तालुका अध्यक्ष किशोर बाबू शिंगरे, युवक काँग्रेस अध्यक्ष चिमूर विधानसभा रोशन ढोक, चिमूर शहर अध्यक्ष अविनाश अगडे, माजी अल्पसंख्यांक अध्यक्ष जावाभाई शेख, संदीप कावरे, उपस्थित होते.

शिवजयंतीच्या निमित्याने वाढोणा येथे रक्तदान शिबीरात २२ रक्तदात्यांनी केले रक्तदान

तळोधी (बा) । प्रतिनिधी

नागभीड तालुक्यातील वाढोणा येथील राजे शिवछत्रपती संभाजी महाराज मंडळ यांच्या वतीने शिवजन्मोत्सव सोहळा निमित्त गुरुदेव सेवा मंडळ सभागृहात शनिवारला रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरात एकूण २२ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक दायित्व पार पाडले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून गुरुदेव सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन पत्रकार सुभाष गजभे, पं. स. माजी सभापती संजय घोनमोडे, महाराष्ट्र राज्य शिक्षण जिल्हा कोषाध्यक्ष धनंजय बोरकर, सिंधु येसनसुरे, छत्रपती बोरकर, उपस्थित होते. या रक्तदान शिबिरात सर्व रक्तदात्यांना प्रमाणपत्र, व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.डॉ. हेडगेवार ब्लड बँक नागपूर येथील चमुने काम पाहिले.या शिबिराचे आयोजन मंडळाचे अध्यक्ष चेतन कापगते, सचिव गणेश कावळे, आशिष मस्के,कुणाल बोरकर, हर्षद गोपाले, जीवन मरसकोल्हे,या युवकांनी सहभाग घेतला.

आज तळोधी(बा).येथे नरेंद्रचार्य महाराज संस्थान तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन

तळोधी (बा) । प्रतिनिधी



स्व स्वरूप संप्रदाय श्री स्वामी नरेंद्रचार्य महाराज संस्थान शाखा आयुष रक्तपेटी नागपूरच्या सहकार्याने तळोदी येथे श्री साई मंदिर देवस्थान येथे दिनांक १८ फरवरी २०२० रविवारला रक्तदान शिबिराचे सकाळी ९ते ५या दरम्यानआयोजन केलेले आहे तरी जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी या संधीच्या फायदा घ्यावा असे आवाहन जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान शाखा तळोधी च्या वतीने करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती तालुका शाखा वरोराची कार्यकारणी गठीत

प्रा.डॉ.अविनाश पंधरे,अध्यक्ष तर नीरज आत्राम कार्याध्यक्षपदी निवड

वरोरा । प्रतिनिधी

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती तालुका शाखा वरोरा ची कार्यकारणी माधव बावगे राज्य कार्याध्यक्ष म. अं. नि.स. प्राचार्य सविता शेटे राज्य विवेक वाहिनी विभाग कार्यवाह, पी. एम. जाधव जिल्हाध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली गठित करण्यात आली. वरोरा तालुका अध्यक्ष प्रा. डॉ. अविनाश पंधरे, कार्याध्यक्ष नीरज आत्राम, उपाध्यक्ष प्रदीप कोहपरे, उपाध्यक्ष प्रा. डॉ. नरेंद्र पाटील, प्रधान सचिव परमानंद तिराणिक, बुवाबाजी संघर्ष विभाग कार्यवाह प्रा. तिलक ढोबळे, विविध उपक्रम विभाग कार्यवाह प्रा. आशिष येटे, वैज्ञानिक जाणीव शिक्षण प्रकल्प विभाग कार्यवाह प्रा. हेमंत परचाके, युवा सहभाग विभाग कार्यवाह प्रा. विजय गाठले, सोशल मीडिया प्रमुख ग्यानीवंत गेडाम, सल्लागार प्रा. डॉ. सुधाकर पेटकर, सदस्य सचिन नाखले, प्रा. मनोहर चौधरी, प्रा. हर्षल चौधरी, प्रेमानंद नगराळे आदींची पदाननिहाय निवड करण्यात आली. या निवडीबद्दल सर्व स्तरातून पदाधिकारी व सदस्यांवर शुभेच्छांचा तथा अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

जितूरात सकल मराठा समाजाचे बैलगाडीसह जेल भोरो आंदोलन

जिंतूर । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मागील सहा दिवसांपासून मराठा आरक्षणाचा मागणीसाठी आमरण उपोषणाला बसलेले मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती बिघडली असल्यामुळे सकल मराठा समाज राज्य सरकारच्या विरोधात आक्रमक भूमिका घेत आहे म्हणून दिनांक १६ फेब्रुवारी रोजी १२ वाजता जिंतूर तालुक्यातील सकल मराठा समाजाने बैलगाडीसह जेलभरो आंदोलन केले यावेळी मोठ्या प्रमाणत मराठा समाज सामील झाला होता मराठा समाजाचे संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणाचा मागणीसाठी मागील सहा दिवसांपासून आमरण उपोषणाला बसले आहे यावेळी त्यांची दिवसेंदिवस प्रकृती खालावत चाललेली आहे मात्र राज्य सरकारकडून वेळ काढू पणा होत असून उपोषणाची दखल घेतली जात नाही म्हणून राज्यात सर्वत्र आंदोलनास सुरवात झाली आहे त्या अनुषंगाने तालुक्यातील सकल मराठा समाजाने शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र जमवून बैलगाडीसह जेलभरो आंदोलन करण्यात आले यावेळी मराठा समाजातील तरुणांनी आपल्या मनोगतातून राज्यसरकार विरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली दरम्यान पोलिसांनी सर्व आंदोलनकर्त्याना ताब्यात घेऊन सोडून देण्यात आले शिवाय आगामी काळात मराठा आरक्षणाचा तिढा सुटला नाही तर आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.यावेळी पोलीस निरीक्षक बुद्धिराज सुकाळे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

आ.जोरगेवार यांच्या पूढाकाराने महाकाली मैदानात रंगला कुस्तीचा महामुकाबला,सिंकदर ठरला अजिंक्य

हजारो चंद्रपूरकर बनले ऐतिहासिक कुस्तीचे साक्षीदार

चंद्रपूर । आशिष घुमे

चंद्रपूरचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या पूढाकाराने ४८ वर्षा नंतर चंद्रपूरातील महाकाली मैदानात कुस्तीचा महामुकाबला रंगला या कुस्तीत महाराष्ट्र केसरी सिंकदर शेख याने राष्ट्रीय कुस्तीपट्टू दीपक काकरण याचा अवघ्या तिन मिनिटांच्या आत पराभव करत मानाच्या गदेचा मान मिळविला. तर यावेळी झालेल्या महिला कुस्तीत अर्जुन पुरस्कार प्राप्त दिव्या काकरण हिने पंजाब व हरियाना केसरी जसप्रीत कौर हिचा पराभव करत विजय मिळविला या स्पर्धेला महान भारत केसरी योगेश बोंबळे यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती होती.

सदर सर्व विजेत्या कुस्तीपट्टुंना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम व पूरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी आमदार किशोर जोरगेवार, कल्याणी किशोर जोरगेवार, सेवादलचे अध्यक्ष सूर्यकांत खनके, माजी नगराध्यक्ष डॉ. सुरेश महाकुलकर, माजी नगरसेवक बलराम डोडाणी,अशोक मत्ते, माजी नगरसेवक पप्पू देशमुख, अशोक नागापूरे, सुनिता लोढीया, विना खणके, संदीप गड्डमवार, डॉ. किर्तीवर्धन दिक्षित, मधुसूधन रुंगठा, अजय जयस्वाल, विजय चहारे, श्याम धोपटे, भालचंद्र दानव, मतिन शेख, कुणाल चहारे, सतिश भिवगडे, राजू शास्त्रकार, वासू देशमुख, सुहास बनकर, धनंजय येरेवार, प्रवीण जथाडे आदींची मंचावर उपस्थिती होती.

चंद्रपूरात मागील काही दिवसांपासून आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून विविध खेळांचे आयोजन केल्या जात आहे. यात क्रिकेट, बॉडी बिल्डिंग, कबड्डी नंतर राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. माता महाकालीच्या मैदानात तब्बल ४८ वर्षा नंतर कुस्तीचा थरार चंद्रपूरकरांना अनुभवायला मिळाला. यावेळी महान भारत केसरी योगेश बोंबाळे यांची विशेष उपस्थिती होती. गांधी चौकातून महाराष्ट्र केसरी सिंकदर शेख आणि पंजाब व हरियाना केसरी जसप्रीत कौर यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांची उपस्थिती होती. या दरम्यान विविध सामाजिक व क्रिडा संघटनांच्या वतीने रॅलीचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात



आले. सदर रॅली अंचलेश्वर गेट होत महाकाली मंदिरच्या पटांगणात पोहचली. त्यानंतर या विशेष कुस्ती सामन्यांना सुरवात झाली. यावेळी पंजाबचे कमलजित सिंग यांची वाशिमचे विजय शिंदे यांच्यात लढत झाली या लढतीत कमलजित सिंग या कुस्तीगीराचा विजय झाला. त्यानंतर पंजाब व हरियाना केसरी जसप्रीत कौर व अर्जुन पुरस्कार प्राप्त दिव्या काकराण यांच्यात लढत झाली या लढतीत अर्जुन पुरस्कार दिव्या काकराण हिने विजय मिळवत मानाची गदा मिळविली. या नंतर सर्वांचे लक्ष लागलेल्या सिकंदर शेख व राष्ट्रीय कुस्तीपटू दीपक काकरण यांच्यात कुस्तीचा थरार रंगला. या सामन्याला पंच म्हणून धर्मशील कातकर हे प्रसिध्द पंच लाभले होते. ही कुस्ती पाहण्यासाठी हजारो नागरिक उपस्थित होते. या सामन्यात तिन मिनीटाच्या आत सिंकदर शेख याने प्रतिस्पर्धी दिपक यांचा पराभव करत विजय मिळविला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंढरपूरचे मदने आणि प्रा. श्याम हेडाऊ यांनी केले. या कार्यक्रमाला यंग चांदा ब्रिगेडचे अल्पसंख्यांक विभाग प्रमुख सलिम शेख, युवा नेते अमोल शेंडे, चंद्रशेखर देशमुख, बंगाली समाज विभाग महिला शहर प्रमूख सविता दंडारे, सायली येरणे, आदिवासी विभाग जिल्हा अध्यक्ष जितेश कुळमेथे, राशिद हुसेन, युवती प्रमुख भाग्यश्री हांडे, प्रतिक शिवणकर करणसिंग बैस यांच्यासह कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

चंद्रपूरातील कुस्तीला गतवैभव मिळवून देणार–आ.जोरगेवार

“ १९७५ साला नंतर आपण चंद्रपूर मध्ये कुस्तीचा महामुकाबला घडवून आणला आहे. केवळ मनोरंजन हा या मागचा उद्देश नसुन वेसन मुक्त समाज आणि सृदृढ भावी पिढी घडविणे हा या मागचा मुख्य हेतु आहे. या स्पर्धेला आपण दिलेला प्रतिसाद उर्जा वाढविणारा आहे. आता दर वर्षी आपण येथे कुस्तीचे आयोजन करणार असून चंद्रपुरातील कुस्तीला गतवैभव प्राप्त करुन देण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे. यात माजी कुस्तीगीरांचाही आम्हाला सहयोग लागणार आहे. पूढील वर्षीची कुस्ती मातीत खेळविण्याचा आमचा प्रयत्न असणार असेही ते यावेळी म्हणाले. तर यावेळी सिकंदर शेख म्हणाले कि, चंद्रपूरमध्ये प्रेम मिळाले. कुस्तीसाठी येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित झाले आहे. आपणही आपल्या मुलांना कुस्तीसाठी तयार करावे असे ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमात माजी कुस्तीपट्टुंचा सत्कार करण्यात आला.

नैना सूर्यवंशी हिने संशोधन केलेल्या प्रतिकृतीची इन्स्पायर अवॉर्ड साठी निवड

तळोधी (बा) । प्रतिनिधी

गव्हर्मेंट ऑफ इंडिया मिनिस्ट्री ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी तर्फे घेतल्या जाणाऱ्या इन्स्पायर अवॉर्ड सण २०२३-२४ साठी जिल्हा परिषद उच्च प्राथमीक शाळा पारडी(ठवरे) येथील विद्यार्थिनी नैना उमेश सूर्यवंशी वर्ग सातवा हिच्या संशोधन केलेल्या प्रतिकृतीची निवड झालेली आहे.

यात सुबोध देविदास हजारे विज्ञान विषय शिक्षक यांनी तिला मार्गदर्शन केले. सन २०१८ -१९ पासून आतापर्यंत या शाळेच्या चार संशोधन प्रतिकृतीची निवड इन्स्पायर अवार्ड साठी झालेली आहे. या सर्व प्रतिकृतींसाठी सुबोध देविदास हजारे विज्ञान विषय शिक्षक यांनी मार्गदर्शक शिक्षक म्हणून काम पाहिले आहे. तिच्या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक अशोक शेंडे, सर्व शिक्षक वृंद, युवराज ठवरे अध्यक्ष शाळा व्य.स.पारडी(ठवरे), शारदा मेश्राम उपाध्यक्षा शाळा व्य.स.पारडी(ठवरे) तथा सर्व सदस्य शा व्य. समिती पारडी (ठवरे),

प्रदीप मोटघरे केंद्रप्रमुख मिंडाळा , सुनीता भंडारे विस्तार अधिकारी बीट बाळापूर, संजय पालवे गटशिक्षणाधिकारी नागभीड, प्रणाली कोचरे गटविकास अधिकारी नागभीड, गावातील नागरिक यांनी तिचे खूप खूप अभिनंदन केले .

कॅनरा बँकेकडून पिक कर्जाची नोटीस अचानक प्राप्त झाल्याने महिलेचा मृत्यू

मानवत । प्रतिनिधी

मानवत येथील बँकेकडून पिक कर्जाची नोटीस अचानक खातेदारास प्राप्त झाल्याने महिलेचा मृत्यू झाला आहे. या बाबतची तक्रार मानवत तालुक्यातील मौ. वझूर खु. येथील अर्जदार प्रभाकर सखाराम गिराम यांनी मानवत तहसील प्रसासना मार्फत कृषि मंत्री ना. धनंजय मुंडे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी देण्यात आलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, मानवत तालुक्यातील मौ. वझुर खु. येथील खातेदार अशाबाई सखाराम गिराम ह्या विधवा स्त्री असुन त्या मानवत येथील कॅनरा बँक शाखेचा खातेदार होत्या सदरील बँक शाखेकडून त्यांनी पिक कर्ज घेतले होते परंतु अवकाळी पाऊस व दुष्काळी परिस्थितीमुळे त्या पिक कर्ज वेळेवर भरू शकल्या नाहीत त्यामुळे त्यांना मानवत येथील कॅनरा बँक शाखेकडून दिनांक १८ ऑगस्ट २०२३ रोजी नोटीस पाठवुन त्यात रु. ०७ लाख १९ हजार ७१ रुपये पंधरा दिवसात भरावे असा उल्लेख केला त्यामुळे आशाबाई सखाराम गिराम यांनी कर्ज रक्कमेचा धसका घेतला व त्यांचा मृत्यू हा पाथरी येथील वरद हॉस्पीटल मध्ये २९ /१२/२०२३ रोजी ५. ४५ वाजता झाला त्यामुळे या मृत्यू स जबाबदार ही मानवत येथील कॅनरा बँक असून सदरील या बाबत विचार करून मयत आशाबाई सखाराम गिराम यांना न्याय द्यावा अशी तक्रार प्रभाकर सखाराम गिराम यांनी दिली आहे.



गुलामीच्या श्रृंखला तोडणारा : छत्रपती शिवाजी

जनमानसात शिवकार्या संबंधी जी काही स्थुल कल्पना असते, त्यापेक्षा महात्मा फुल्यांची कल्पना फार वेगळी होती अर्थात एक लोकोत्तर शुरवीर पुरुष, जन्मजात जननेता, स्वराज्य संस्थापक, लोककल्याणाची सदैव काळजी वाहणारा राज्यकर्ता या विविध नात्यांनी शिवाजीची व शिवकार्याची जी महती आहे, ती फुल्यांना नि:संशय मान्य होती. परंतू शिवाजी हा हिंदूधर्मरक्षक होता, त्याचे राज्य हे हिंदू धर्मराज्य होते. तो गोब्राम्हण प्रतिपालक, क्षत्रीय कुलावतंस छत्रपती होता. अशी शिवकार्याची महती काहीजणांकडुन सतत आणि पध्दतशीर पणे मांडण्यात येते ती महात्मा फुल्यांना अजिबात मान्य नव्हती आणि त्यांना त्याबद्दल कौतुकही नव्हते.

छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन म्हणजे एक दैवी चमत्कार होता. त्यांची आई जिजाबाई ही लखुजी जाधवराव या निजामशाहीतील शुरसरदाराची मुलगी तर वडील शहाजीराजे भोसले हे स्वकर्तृत्वाने सामर्थ्यवान असलेल्या मालोजीराव भोसले यांचे चिरंजीव. राजकारणात मुरलेल्या व आनंदाचा उन्मेश बाळगणा-या माता-पित्यांच्या पोटी शिवाजींचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० यावर्षी वैशाख शुध्द द्वितीय जुन्नर जवळील शिवनेरी या किल्यावर झाला. त्यामुळे शिवाजी महाराज हे महाराष्ट्रातल्याच नाहीतर अखिल भारतातल्या प्रत्येकाचे स्फुर्तीदायी दैवत आहे.

शिवाजीला लढाईचे आणि राज्यकारभाराचे शिक्षण दादोजी कोंडदेव यांनी दिले. दहा-बारा वर्षाचा असतानाच शिवाजींच्या मनात स्वातंत्र्याचे वारे खेळू लागले. माझा देश मोगलांच्या आणि मुसलमानांच्या गुलामीतून मुक्त करायचा, माझ्या बांधवांना गुलामीतून आणि छळातून सोडवायचे. शिवाजींनी सफद्रीच्या कडेकपारीत भटकून सवंगडी गोळा केले. तानाजी, नेताजी, सुर्याजी, बाजी, वेसाजी असे एका पेक्षा एक जिवाला जीव देणारे मित्र गोळा केले. श्री रोहिडेश्वराच्या साक्षीने स्वराज्याची शपथ घेतली आणि एका स्वरात घोषणा दिली. 'हर हर महादेव' महाराष्ट्रातल्या मावळखोऱ्या पासुन त्यांनी आपल्या लढयाला आरंभ केला. साम-दंड-भेदांचा उपयोग करत अवघ्या चौदाव्या वर्षी शिवाजीनी 'तोरणागड' जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले. मग त्यांनी मागे वळुन पाहिलेच नाही एका मागून एक गड आणि किल्ले जिंकून घेतले. युध्दात शक्तीपेक्षा युक्तीच्या वापर जास्त केला. राक्षसी देहाचा अफजलखान भेटीचे ढोंग करुन शिवाजींचा घात करायला आला होता.

त्यांनी पारतंत्र्यातून स्वातंत्र्याकडे जाण्यासही प्रेरणा मिळावी असे आपले चरित्र घडविले आणि एक मोठा आदर्श निर्माण केला कोणत्याही कार्याचा आरंभ लहानशा मर्यादित होतो आणि पुढे ते कार्य मोठया मर्यादित गेलेले आढळते. पवित्रगंगेचा उगम आणि पुढे तिचा झालेला विस्तार हे उदाहरण या दृष्टिने लक्षात घेण्या सारखे नाही कां ? तर शिवाजी महाराजांचे कार्य जरी आरंभी महाराष्ट्राच्या विविध विषयाचा विरोध प्रकट करुन स्वराज्य स्थापनेच्या प्रयत्नापुरता मर्यादित असला तरी लोकांच्या मनात जी स्वातंत्र्यप्रेमाची ज्योत पेटली त्यामुळेपुढे भारतात दक्षिणोत्तर ती प्रेरणा निर्माण झाली.

१३ व्या शतकांत देवगीरीच्या यादवांची सत्ता संपविणाऱ्या परधर्मी काही सत्ताधिशांनी महाराष्ट्रावर पुढे दोन-तीनशे वर्षे सत्ता गाजविली. जसजशी त्यांची सत्ता मजबूत होत गेली, तसतशी त्यांच्यातली जुल्मी प्रवृत्ती वाढीला लागली. आपल्या प्रजेवर अन्यायाने कर लादणे, त्यांची घरे दारे आणि जमिनी बळकाविणे, स्त्रियांची अब्रू लुटणे आणि गुलाम म्हणून प्रजेला राबवणे असे प्रकार सुरु झाले. सारी मराठी माणसे मनातून या जुलूमी सत्तेवर रागावली होती, पण म्हणतात ना सत्ते पुढे शहाणपण चालत नाही - तशी अवस्था होती. औरंगजेब हा जबरदस्त लष्करी सामर्थ्यांचा, पराक्रमी, कट्टर मुसलमानपंथीय व दक्षिणेतील राजकारणाची माहिती असलेला बादशाह होता. पण शिवाजीने अफझलखान सारख्या पराक्रमी मुसलमान सरदारास यमसदनी पाठविल्यानंतर तो जिवंत असे पर्यंत महाराष्ट्रात येण्याची त्याची छाती झाली नाही. औरंगजेबाने शिवरायांना पकडून आग्रा येथे ठेवले, पण तेथूनही ते शिताफीने निसटले, तेव्हा औरंगजेबाने त्यांचा धसकाच घेतला.

स्वदेश स्वतंत्र व्हावा ही माता-पित्यांची इच्छा शिवाजीने पूर्णकेली. हिंदु धर्माचा पाडाव करुन सर्व हिंदुस्थान मुसलमानमय करुन टाकावाया महत्वाकांक्षेने झपाटलेला औरंगजेब हा दिल्लीच्या तख्तावर होता. विजापूरची आदिलशाही, अहमदनगरची निजामशाही, गोवलकोंडयाची कुतुबशाही अशा वेढयात सापडलेला पूणे-सुपे परिसर या तिन्ही मुस्लिम राज्यांवर औरंगजेबाची हुकूमत होती. तो दिल्लीहून सतत त्यांना सैन्य व पैसा पुरावत होता. माता जिजाऊंनी शिवाजीराजांच्या मनात या अन्यायकारी वृत्ती विषयाचा विरोध आणि बीज निर्माण करुन स्वांतत्र्य आणि स्वराज्य या विषयींच्या निष्ठा निर्माण केल्या. शिवाजीराजांच्या अंगभूत गुणांचा विकास केला आणि हळूहळू शिवाजीराजे त्या दिशेने प्रयत्न करु लागले. मराठी माणसांच्या मनातल्या रागाला नेमकी दिशा दाखविण्यासाठी त्यांनी 'मराठा तितुका मेळवावा' हे सुत्र धरुन स्वातंत्र्यप्रेमी, पराक्रमी आणि निष्ठावान माणसांना एकत्र केले. यावेळी त्यांच्या लक्षात आले की, काही स्वार्थी मराठी माणसे सरदारकी, जहागिरी आणि मोठया हुद्यासाठी परक्या सत्ताधिशांच्या चाकरीत धन्यता मानून शिवाजीराजांच्या स्वातंत्र्य लढयाला विरोध करत होते.

रायगडावर भेट ठरली, मिठी मारण्याचे सोंग करुन त्यांने शिवाजीवर तलवार चालवली. पण शिवाजी सावध होताच हातात लपविलेल्या वाघ नखांनी अफजलखानाचा कोथळाच बाहेर काढला. पळून गेला म्हणून शाहिस्ते खान भेटला, शिवाजी महाराज स्वराज्य निर्माण करतांना येणाऱ्या प्रत्येक संकटाला जोमाने सामोरे गेलेच पण त्यांचे संवगडीही त्यांना समर्थ साथ देत होते. सिंहगड सर करतांना तानाजी पडला. खिंड लढवितांना बाजीप्रभुने छातीचा कोट केला. महाडकर, प्रतापराव गुर्जर अशा एकाहुन एक शुर संवगड यांनी आपलं मत दिले. आपले प्राण दिले. तेव्हा स्वराज्य आकाराला आले. स्वराज्यात आता ८५ किल्ले आणि दोनशे चाळीस गड आहेत.

लोकांनी शिवाजी महाराजांना राज्यभिषेक करवून घेण्याचा आग्रह केला. महाराजांनी आपल्या मातेशी आणि जवळच्या सरदारांशी चर्चा करुन राज्यभिषेक करवून घ्यायचा असे ठरवले. काशीचे प्रसिध्द पंडीत गागाभट्ट धार्मिक विधी करण्यासाठी आले. स्वराज्याची राजधानी रायगड ठरली. शिवाजी राजा सिंहासनावर बसला. लोकांनी जयजयकार केला, छत्रपती श्री शिवाजी महाराज की जय' शिवाजी महाराजांनी आपले जीवन देव, देश आणि धर्म यासाठी वेचले. संत तुकाराम हे त्यांचे आध्यात्मिक गुरु होते तर संतरामदास हे त्यांचे राजकीय गुरु होते. शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक ६ जून १६७४ साली रायगडावर झाला. त्यानंतर थोडयाच काळात म्हणजे ६ वर्षानंतर ३ एप्रिल १६८० मध्ये शिवाजी महाराजांचे रायगडावर निधन झाले. रामदासांनी त्यांचे गुणगौरव करतांना म्हटले,

निश्चयाच्या महामेरु । बहुत जणासी आधारु ।।
अखंड स्थितीच्या निर्धारु । श्रीमंत योगी ।।

इतिहासाच्या पानावररयतेच्या मनावरमातीच्या कणावर-आणि विश्वासाच्या प्रमाणावर राज्य करणारा राजा म्हणजे, राजा शिवछत्रपतींच्या ३९५ व्या जयंती निमित्त मानाचा मुजरा !

प्रविण बागडे
जरीपटका, नागपूर - १४
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

इंग्रजी शाळांच्या शैक्षणिक शुल्कावर नियंत्रण कोणाचे? इंग्रजी शाळांमधील ‘आरटीई’ प्रवेश बंदमुळे यंदा खासगी शाळांचे शुल्क वाढण्याची शक्यता

सोलापूर : जिल्ह्यात जवळपास ४०० स्वंयअर्थसहाय्यित शाळा असून, नावाजलेल्या इंग्रजी शाळांचे शैक्षणिक शुल्क ४० ते ७० हजारांपर्यंत आहे. दरवर्षी शुल्क वाढते, पण त्याची माहिती शिक्षणाधिकाऱ्यांपर्यंत पोचत नाही. आता इंग्रजी शाळांमधील ‘आरटीई’ प्रवेश बंद होणार असल्याने यंदा अनेक शाळांकडून शुल्क वाढविण्याची शक्यता आहे. त्यामुळे शाळा व पालकांच्या शुल्क नियमन समितीत वार्षिक शुल्क ठरवितानाच खबरदारी घ्यावी. शाळेचे नियम व अटी मान्य असतील तरच पालकांनी विद्यार्थ्यांचा प्रवेश तेथे निश्चित करावा, अन्यथा कालांतराने शुल्कासंदर्भात तक्रार केल्यानंतर शिक्षणाधिकाऱ्यांना काहीच करता येत नाही ही वस्तुस्थिती आहे.

सोलापूरसह मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर अशा मोठ्या शहरांमध्ये स्वंयअर्थसहाय्यित इंग्रजी शाळांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांसह खासगी अनुदानित शाळांच्या परिसरातच अशा शाळा उघडल्या जात असल्याने अनेक अनुदानित व जिल्हा परिषद, महापालिकांच्या शाळांना घरघर लागली आहे. दरवर्षी पटसंख्येअभावी हजारो शिक्षक अतिरिक्त होतात ही वस्तुस्थिती आहे. काही वर्षांत जिल्हा परिषदेच्या अंदाजे ३२ शाळांना टाळे लागणार असून, सध्या दोनशे शाळांचा पट १ ते २० पर्यंतच आहे. शासकीय शाळांची गुणवत्ता व इंग्रजी शिक्षणाचा अभाव, यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी पालकांचा कल आता इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे वाढला आहे. पालकांचा हा कल ओळखूनच इंग्रजी शाळांकडून दरवर्षी शैक्षणिक शुल्कात वाढ केली जात असल्याचे चित्र आहे.खासगी शाळांच्या शुल्क वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शुल्क नियंत्रण कायदा असून, दरवर्षी किती शुल्क वाढवायचे हे ठरलेले आहे. शाळांमध्येही पालक आणि शाळेची स्वतंत्र शुल्क नियमन समिती असते. प्रवेश सुरू झाल्यावर समितीच्या पहिल्याच बैठकीत शुल्क निश्चित होते. त्याची माहिती पालक व शाळांनाच असते, आम्हाला त्यासंबंधीची माहिती नसते. त्यामुळे पालकांनी प्रवेशावेळी शुल्क परवडत असेल तरच त्याठिकाणी प्रवेश घ्यावा, अन्यथा शासकीय अनुदानित शाळांमध्येही ते मुलांचा प्रवेश घेऊ शकतात.इंग्रजी शाळेत प्रवेश घेताना शाळेच्या प्रवेश अर्जावरील नियम व अटी पालकांनी जाणून घ्याव्यात. त्या सर्व मान्य असतील किंवा तेवढे शुल्क देण्याची तयारी असेल तरच त्याठिकाणी मुलाचा प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन शिक्षणाधिकाऱ्यांनी केले आहे.राज्यातील खासगी अनुदानित शाळांनाही काही वर्ग इंग्रजी माध्यमाचे सुरू करण्यास मान्यता देण्याचे धोरण शालेय शिक्षण विभागाकडून तयार केले जात आहे. जेणेकरून पालकांनाही परवडणाऱ्या शुल्कात विद्यार्थ्याला दर्जेदार व इंग्रजीचे शिक्षण देण्याची संधी उपलब्ध होईल. दुसरीकडे स्वंयअर्थसहाय्यित इंग्रजी शाळांची मक्तेदारी मोडीत निघेल आणि त्यांच्या शुल्क वाढीवर आपोआप नियंत्रण येईल, असाही त्यामागील हेतू असणार आहे. पण, अनुदानित शाळांनी इंग्रजी माध्यमाच्या वर्गासाठी मान्यतेचे प्रस्ताव पाठवावे लागतील आणि त्या वर्गावरील शिक्षक शाळेनेच स्वत: भरायचा असून त्यांना शासनाकडून कोणतेही अनुदान मिळणार नाही, असे धोरण प्रस्तावित असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ‘सकाळ’शी बोलताना सांगितले.

सेल तालुक्यातील मराठा समाजाचे रस्ता रोको आंदोलन

सेलू । प्रतिनिधी

दि.१७ फेब्रुवारी रोजी मराठा समाजाच्या आरक्षणा च्या प्रश्नावर विशेष अधिवेशन बोलवावे, या मागणीसाठी मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी सुरु केलेल्या बेमुदत उपोषणास पाठींबा म्हणून सेलू सकल मराठा समाजाच्या वतीने शनिवार १७ फेब्रुवार रोजी रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. सेलू तालूका रस्ता रोको आंदोलनसाठी तालुक्यातील अनेक ठिकाणीरास्त रोको आंदोलन करण्यातआले.

सेलू तालुक्यातील मराठा आरक्षणासाठी मोरेगाव ,वालूर,कुंडी,रेल्वे गेट सेलू, पावडे हादगाव ,देवगाव फाटा,गोगलगाव पाटी अशा ठिकाणी रस्ता रोको आंदोलन करत तारीख प्रशासनाला निवेदन देत लवकरात लवकर आरक्षणाचा निर्णय घ्यावा नाहीतर याबद्दल यापेक्षाही तीव्र आंदोलन करण्यात येईल असे निवेदन देण्यात आले.

सुखविंदरसिंगच्या तालावर थिरकली तरुणाई उपस्थितांचा प्रत्येक गीताला उत्स्फुर्त प्रतिसाद

बल्लारपूर सांस्कृतिक महोत्सवाचे थाटात उद्घाटन

चंद्रपूर । प्रतिनिधी

आजा आजा जींद शामियाने के तले....आजा जरी वाले नीले आसमान के तले...जय हो... ‘कुछ करीए, कुछ करीए...... नस नस मेरी खोले....चक दे....चक दे इंडिया’ अशा देशभक्ती आणि इतर जल्लोशपूर्ण गीतांना तरुण – तरुणी, गृहिणी, बच्चेकंपनी आणि नागरिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. निमित्त होते बल्लारपूर सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्घाटनाचे. चार दिवसीय या कार्यक्रमाचा आगाज शनिवारी (दि.१७) प्रसिध्द पार्श्वगायक सुखविंदसिंग यांच्या स्वरसंध्या या कार्यक्रमाने झाला आणि त्यांच्या प्रत्येक गीतावर तरुणाई अक्षरश: थिरकली.बल्लारपूर शहराला ६०० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्य संचालनालय, जिल्हा प्रशासन आणि बल्लारपूर नगर परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने, बल्लारपूर सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रसिध्द पार्श्वगायक सुखविंदसिंग यांच्या ‘स्वरसंध्या’ या कार्यक्रमाने महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. गायिका माधवी श्रीवास्तव यांच्या गीताने कार्यक्रमाची सुरवात झाल्यावर सुखविंदरसिंग यांची स्टेजवर धमाकेदार एन्ट्री झाली आणि उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात आणि जल्लोषात त्यांचे स्वागत केले.आपल्या अनोख्या शैलीत ‘चल छैया छैया छैया छैया’.. ‘मैं प्रेम का प्याला पी आया.पल में सदिया जी आया’. ‘होले होले से दुवा लगती है..’ ‘बिडी जलाईले जीगर से पिया.जीगर में बडी आग है’.. ‘उडी उडी जाये, उडी उडी जाये.दिल की पंतग देखो उडी उडी जाये’. अशी एकापेक्षा एक अप्रतिम आणि नागरिकांच्या आवडीची गाणे म्हणत सुखविंदसिंग यांनी उपस्थितांची मने जिंकली. उपस्थित प्रेक्षकांनीही त्यांच्या प्रत्येक गीताला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. यावेळी सुखविंदसिंग यांना गायिका माधवी श्रीवास्तव यांची सोबत होती. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी सुखविंदरसिंग यांचा भेटवस्तू देऊन सन्मान केला. कार्यक्रमाचे उद्घाटन करतांना जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. म्हणाले, राज्य शासनाच्या वतीने स्थानिक लोककला, संस्कृतीचे जतन करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. बल्लारपूर येथेही १७ ते २० फेब्रुवारी या कालावधीत चार दिवसीय महासंस्कृती महोत्सव नागरिकांसाठी करण्यात येत असून बल्लारपूरकरांनी या महोत्सवाचा लाभ घ्यावा व हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी मंचावर मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, बल्लारपूरचे उपविभागीय अधिकारी अजय चरडे, विशेष कार्य अधिकारी डॉ. विजय इंगोले, नगर परिषदेचे मुख्याधिकारी विशाल वाघ, तहसीलदार ओंकार ठाकरे, चंदनसिंह चंदेल, प्रकाश धारणे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.१७ ते २० फेब्रुवारी २०२४ या कालावधीत बल्लारपूर येथील जुना क्रीडा संकूल येथे आयोजित महासंस्कृती व बल्लारपूर महोत्सवात विविध कार्यक्रमांची मेजवानी नागरिकांना उपलब्ध होणार आहे. यात १७ फेब्रु. रोजी सुखविंदरसिंग यांची स्वरसंध्या, १८ रोजी वाघनृत्य, शिवमहिमा (नृत्य नाटक) आणि गर्जा महाराष्ट्र माझा, दि. १९ रोजी अशोक हांडे यांचे ‘आजादी – ७५’ नाट्य आणि शेवटच्या दिवशी २० फेब्रुवारी रोजी संस्कार भारती कार्यक्रम होणार आहे.या सर्व कार्यक्रमांना नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमांचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासन व बल्लारपूर नगर परिषदेच्यावतीने करण्यात आले आहे.

महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पोचे पुण्यात २४ फेब्रुवारीपासून आयोजन

मुंबई । प्रतिनिधी

संरक्षण उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भर भारताच्या वाटचालीला अधिक बळकटी देण्यासाठी राज्य शासनाच्या उद्योग विभागामार्फत महाराष्ट्रातील संरक्षण साहित्य उत्पादन कारणाऱ्या सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राला चालना देण्यासाठी २४ ते २६ फेब्रुवारी २०२४ दरम्यान पुणे येथे ’महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पो’ आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे संरक्षण उत्पादन क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी राज्यातील सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (चडचएे) सक्षम करणारा महाराष्ट्रातील हा अशा प्रकारचा पहिलाच डिफेन्स एक्स्पो असून पुण्यातील आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि कन्व्हेन्शन सेंटर येथे आयोजित करण्यात आला आहे.

संरक्षण उत्पादन क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि प्राविण्य असणाऱ्या उद्योगातील समन्वयाला चालना देण्याच्या उद्देशाने जल, स्थल आणि वायू या तिन्ही सुरक्षा दलांचा यात महत्वाचा सहभाग असणार आहे. यात दोनशेहून अधिक सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग, स्टार्ट–अप आणि २० हजारहून अधिक अभियांत्रिकी विद्यार्थी एकत्र येऊन ज्ञानाची देवाण–घेवाण करतील.भारताचे औद्योगिक बलस्थान म्हणून ओळखले जाणारे महाराष्ट्र हे आत्मनिर्भर भारताचे संवर्धन करण्यात आघाडीवर असलेले राज्य आहे. राज्यात ३९.८८ लाख एम.एस.एम.ई.चे मजबूत जाळे आहे. ज्यात उद्यम पोर्टलवर १०८.६७ लाख रोजगार आहेत. एम.एस.एम.ई. डिफेन्स एक्स्पो अशा उद्योगांना त्यांच्या क्षमतांचे प्रदर्शन करण्यासाठी आणि संरक्षण उद्योगातील प्रमुख भागधारकांशी जोडण्यासाठी एक समर्पित व्यासपीठ प्रदान करेल.एम.एस.एम.ई. डिफेन्स एक्सपो २०२४ ची ठळक वैशिष्ट्ये : या एक्स्पोमध्ये २०० हून अधिक एम.एस.एम.ई. प्रदर्शक त्यांची संरक्षण– संबंधित उत्पादने, तंत्रज्ञान आणि सेवांचे विविध क्षेत्र जसे की एरोस्पेस, शस्त्रास्त्रे, इलेक्ट्रॉनिक्स, दळणवळण आणि लॉजिस्टिक्स याचे प्रदर्शन करतील. एम.एस.एम.ई. आणि प्रमुख संरक्षण खरेदी संस्था, उद्योग क्षेत्रातील दिग्गज आणि संभाव्य गुंतवणूकदार यांच्यात संवाद सत्रे होतील.नॉलेज सेमिनार : प्रख्यात तज्ज्ञ आणि विचारवंत नेते, संरक्षण क्षेत्रातील नवीनतम ट्रेंड, संधी आणि आव्हाने यावर दृष्टीक्षेप टाकतील.कौशल्य विकास कार्यशाळा : संरक्षण उद्योगाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी एम.एस.एम.ई. कर्मचाऱ्यांची कौशल्ये आणि क्षमता वाढवण्याच्या उद्देशाने परस्परसंवादी सत्रे आयोजित करण्यात आली आहेत.सरकारी सहाय्य उपक्रम : संरक्षण उत्पादनात एम.एस.एम.ई. ना समर्थन देण्यासाठी विविध सरकारी योजना, धोरणे आणि आर्थिक सहाय्य पर्याय प्रदर्शित करण्यात येतील.

धोरणात्मक भागीदारी : संरक्षण क्षेत्रात एम.एस.एम.ई. ना व्यवसाय वाढवण्यासाठी संभाव्य खरेदीदार, सहयोगी गुंतवणूकदारांशी संपर्क साधता येईल. तज्ज्ञांचे सेमिनार आणि कार्यशाळांद्वारे संरक्षण उद्योगातील नवीनतम घडामोडी आणि ट्रेंड्सवर अपडेट मिळू शकतील.आर्थिक सहाय्य : संरक्षण क्षेत्रातील एम.एस.एम.ई. च्या वाढीला चालना देण्यासाठी सरकारी योजना आणि निधीच्या संधी उपलब्ध होतील. या एक्स्पोद्वारे एम.एस.एम.ई. ना सर्वसमावेशक सहाय्य प्रदान करण्यासाठी शासन वचनबद्ध असल्याचे उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी सांगितले. यामध्ये उद्योग जोडणी सुलभ करणे, तांत्रिक सहाय्य ऑफर करणे आणि नियामक प्रक्रिया सुव्यवस्थित करणे समाविष्ट आहे. यामुळे भारताच्या संरक्षण क्षेत्रामध्ये त्यांना सक्रियपणे सहभागी होण्यास सक्षम करतील. एम.एस.एम.ई. डिफेन्स एक्स्पो २०२४ मध्ये एम.एस.एम.ई., संरक्षण अधिकारी, उद्योग प्रतिनिधी, गुंतवणूकदार आणि शैक्षणिक क्षेत्रातील २ हजारहून अधिक संस्था सहभागी होतील, असेही त्यांनी सांगितले. एल ण्ड टी. डिफेन्स, महिंद्रा, टाटा, डीआरडीओ, सोलार, भारत फोर्ज आणि सार्वजनिक संरक्षण क्षेत्रातील उपक्रम (झडण) सारख्या उद्योग क्षेत्रातील दिग्गजांनी केलेल्या नाविण्यपूर्ण संरक्षण उत्पादनामुळे महाराष्ट्राची संरक्षण क्षेत्रात प्रमुख उत्पादक म्हणून ओळख निर्माण झाली आहे. यात सहभागींना फायदेशीर व्यावसायिक संधी, शेकडो कोटींचे संभाव्य करार आणि संरक्षण तंत्रज्ञान निर्यात क्षेत्रातील एमएसएमई आणि स्टार्ट–अप्ससाठी लाभदायक ठरेल.हा एक्स्पो आपल्या राज्याच्या संरक्षण क्षमता बळकट करण्याची शासनाची बांधिलकी अधोरेखित करतो. नाविन्य आणि सहकार्यावर लक्ष केंद्रित करून, हा कार्यक्रम महत्त्वाची भूमिका बजावतो. आत्मनिर्भर भारत उपक्रमांतर्गत आत्मनिर्भरतेकडे, संरक्षण क्षेत्रातील वाढ आणि नवकल्पनांना चालना देणारा आहे , अशा भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केल्या.आत्मनिर्भर भारत ही संकल्पना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सरंक्षण क्षेत्रात आणल्यानंतर मोठ्या प्रमाणात संरक्षण एम.एस.एम.ई. तयार झाल्या आहेत. तिनही सैन्य दलाचा सहभाग यात असणार आहे. आज देशात मोठया प्रमाणात संरक्षण साहित्य निर्माण होत असताना महाराष्ट्रात १० ऑर्डनंस फॅक्टरी आणि ५ डिफेन्स पी. एस. यू. आहेत. याची राज्यात इकोसिस्टिम तयार झाली आहे. टाटा, भारत फोर्ज, सोलार, एल ण्ड टी, अशा मोठ्या कंपन्या राज्यात संरक्षण क्षेत्रात उपादने तयार करतात. यामुळे मोठ्या प्रमाणात उद्योजक येतील, गुंतवणूक वाढेल. मुख्य म्हणजे उत्पादन करणारे आणि खरेदीदार आर्म्ड फोर्स असे दोन्ही एका ठिकाणी एकत्र असतील. उद्योग विभागाने पुढाकार घेऊन ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी परिश्रम घेतले आहेत. आजपर्यंत झालेल्या एक्स्पोमधील सर्वात मोठा एक्स्पो महाराष्ट्रात करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याच्या भावना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केल्या.महाराष्ट्रातील एमएसएमईच्या संरक्षण उत्पादनातील अफाट क्षमतेचा उपयोग करण्यासाठी हा एक्स्पो एक महत्त्वाचा टप्पा आहे. स्थानिक नवकल्पना वाढवून आणि देशांतर्गत पुरवठा साखळी मजबूत करून संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भर होण्याच्या प्रधानमंत्री यांच्या दृष्टीकोनाशी सुसंगत असल्याच्या भावना उद्योगमंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केल्या.

चांदापुर येथील सरपंच व दोन सदस्य अपात्र

विभागीय अपर आयुक्ताच्या आदेशाने स्थानिक राजकारणात खळबळ

मूल । प्रतिनिधी

ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय कामकाजात निष्काळजीपणा व गैरवर्तणुक करून पदाचा दुरूपयोग केल्याचे तपासाअंती सिध्द झाल्याने चांदापूर ग्राम पंचायतीच्या सरपंचा सोनी देशमुख यांचेसह सदस्य विनोद कोहपरे आणि प्रफुल तिवाडे यांना नागपूर विभागीय अपर आयुक्त डॉ. माधवी खोडे चवरे यांनी अपात्र ठरविल्याने स्थानिक राजकारणात खळबळ माजली आहे.

चांदापूर ग्राम पंचायतीचे उपसरपंच अशोक मार्गनवार यांची तक्रार आणि जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुषंगाने नागपूर विभागीय अपर आयुक्त यांनी चांदापूर ग्राम पंचायतीची चौकशी केली. केलेल्या चौकशी नंतर सादर करण्यात आलेल्या अहवालात सरपंच सोनी देशमुख आणि सदस्य विनोद कोहपरे व प्रफुल तिवाडे यांनी सदस्य पदाच्या कार्यकाळात मालमत्ता नष्ट करणे,आर्थिक हानी करणे,ठरावाची अंमलबजावणी न करणे,कर्तव्य पाळण्यात कसूर करणे,स्मशानभुमी जागेबाबत न्यायालयाच्या निर्णयानुसार कारवाई करण्यास प्रशासनास आडकाठी आणणे,गावांचे कामकाज करतांना पारीत ठरावानुसार कामकाज करणे अनिवार्य असते परंतू सरपंच देशमुख आणि सदस्य प्रफुल तिवाडे व विनोद कोहपरे हे पारीत ठरावानुसार अंमलबजावणी न करता वारंवार शासकिय कामात अडचणी निर्माण करणे,घरकुल योजने बाबत शासनाच्या मार्गदर्शक सुचनांचे पालन न करता लाभार्थ्यांना डावलण्याचे काम करणे, खोटी व बनावट माहिती तयार करून प्रशासनाची दिशाभुल करणे, उपसरपंच यांना मानधनाचे धनादेश देण्यास टाळाटाळ करणे,गावांच्या विकासा करीता शासनाकडून प्राप्त झालेला १४ आणि १५ वा वित्त आयोगाच्या अखर्चित निधीबाबत दुर्लक्ष करणे आदि प्रकारात कसुर केल्याचे सिध्द होत असल्याने सरपंच सोनी देशमुख,सदस्य विनोद कोहपरे आणि प्रफुल तिवाडे हे महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कम ३९ (१) नुसार कार्यवाहीस पात्र ठरत असल्याचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉनसन यांनी विभागीय आयुक्त यांचेकडे सादर केला होता.सादर केलेल्या अहवालानुसार अपर आयुक्त डॉ. माधवी खोडे चवरे यांनी ग्राम पंचायत चांदापूर येथील दस्तऐवज आणि प्रत्यक्ष पुराव्याच्या तपासणी अंती सरपंच सोनी देशमुख आणि सदस्य विनोद कोहपरे व प्रफुल तिवाडे यांना अपात्र ठरविले आहे. सदस्यत्व कायम राहावे म्हणून सरपंच सोनी देशमुख आणि दोन्ही सदस्यांनी तालुक्यातील भाजपा आणि काँग्रेसच्या नेत्यांकडून युध्दपातळीवर प्रयत्न केले.राजकिय दबाव आणुन प्रकरणाचा निपटारा होण्यास वेळ मारून नेलीण् शेवअी मात्र कायदयानुसार झालेल्या कार्यवाहीत चांदापूर येथील सरपंच सोनी देशमुख यांचेसह सदस्य विनोद कोहपरे आणि प्रफुल तिवाडे यांना सदस्य पदावरून अपात्र ठरविल्याचे आदेश दिले आहे. त्यामूळे स्थानिक राजकारणात खळबळ माजली असून जिल्हयातील एका भाजप नेत्याच्या मार्गदर्शनात अपर आयुक्त यांचे आदेशाविरूध्द अपील करण्याची तयारी अपात्र सदस्यांनी चालविली असल्याचे बोलल्या जात आहे.

पी.व्ही.पी.कॉलेज ऑफ फार्मसी,पाटोदा महाविद्यालयात विविध क्रीडा स्पर्धा संपन्न

पाटोदा– दिनांक १७/०२/२०२४ रोजी नगराध्यक्ष भारतभूषण क्षीरसागर साहेब यांच्या वाढदिवसा निमित्त पी.व्ही.पी. कॉलेज ऑफ फार्मसी, पाटोदा महाविद्यालयात क्रिकेट, कॅरम, बॅडमिंटन,चेस या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.या क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त असा सहभाग घेतला तसेच क्रीडा स्पर्धा पूर्ण झाल्यानंतर सर्व विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले.या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांचा क्रीडा क्षेत्रातील उत्साह वाढवण्यात आला.याप्रसंगी पी.व्ही.पी. कॉलेज ऑफ फार्मसी, पाटोदा चे प्राचार्य श्री.तांदळे.एस. डी.यांची प्रमुख उपस्थिती होते. तसेच या प्रसंगी या कार्यक्रमानिमित्त प्रा. सर्व प्राध्यापक वर्ग प्रा. पठाण ए. के.,प्रा.सयद टी. क्यु.,प्रा. घुमरे व्ही. एस., प्रा. बहिर एस. एम.,क्षीरसागर सर,चाऊस सर आणि सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग जाधव एस. ए.,सोळुंखे एन.आर., सरवदे.ए.एस, संकेत बहीर,किरण शेकडे,शिंदे व्ही.एस., वाघ बी.ए.,गाडे.एम.एस, तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी आदींच्या उपस्थितीत हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

नागरिकांच्या आरोग्य सुविधांसाठी शिबिराचे आयोजन-मंत्री धर्मराव बाबा आत्राम

आलापल्ली येथे भव्य आरोग्य शिबिर संपन्न

आलापल्ली । प्रतिनिधी

अहेरी परिसरातील नागरिकांना स्थानिक पातळीवर आरोग्य सुविधा मिळाव्यात, याकरिता भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहेत. या शिबीराचा परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मराव बाबा आत्राम यांनी केले.

ते आलापल्ली येथील क्रीडा संकुल मैदानात आयोजित भव्य आरोग्य शिबिराच्या उद्धाटनप्रसंगी बोलत होते.यावेळी प्रमुख पाहुणे माजी जि प अध्यक्ष भाग्यश्री आत्राम,सिनेट सदस्य तनुश्री आत्राम,माजी प स सदस्य हर्षवर्धन बाबा आत्राम, सीआरपीएफ ३७ बटालियनचे कमाडन्ट एम एच खोब्रागडे,राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रवींद्र वासेकर, राष्ट्रवादी महिला काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष शाहीन हकीम,राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष लीलाधर भरडकर,माजी बांधकाम सभापती युधिष्टिर बिश्वास, सरपंच शंकर मेश्राम,राकॉचे अहेरी विधानसभा अध्यक्ष लक्ष्मण येरावार, जिल्हा शल्य चिकित्सक प्रमोद खंडाते,डॉ.भूषण भडके, डॉ.धुर्वे, डॉ.गोपाल रॉय,डॉ चरनजित सिंह सलूजा,कैलास कोरेत आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना विविध आजाराचे योग्य निदान होऊन त्वरित उपचार व्हावे यासाठी एकाच छताखाली व्यवस्था करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.तर पहिल्यांदा अश्या मोठ्या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून नागरिकांचा प्रतिसाद बघता या शिबिराचा रुग्णांसाठी किती महत्व आहे हे लक्षात आल्याचेही त्यांनी म्हटले.शिबिरासाठी उपस्थित तज्ञ डॉक्टर आणि शिबिरासाठी परिश्रम घेणाऱ्या कार्यकर्त्यांचे बाबांनी आभार मानले.माजी जि प अध्यक्ष भाग्यश्री आत्राम यांनी आपल्या मार्गदर्शनात दुर्गम भागातील नागरिकांना विविध आजाराच्या उपचारासाठी शहराच्या ठिकाणी जावे लागू नयेत. त्यांना स्थानिक पातळीवरच उपचाराची सोय व्हावी, याकरिता आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांची विविध आजाराची तपासणी करुन त्यांना काही आजार असल्यास त्यांच्यावर तेथेच औषधोपचार करण्यात येतील. तर गंभीर आजार असणार्या रूग्णांना पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.आरोग्य शिबिराचे जास्तीत जास्त नागरिकांना लाभ घेता यावा यासाठी भाग्यश्री ताई आत्राम यांच्या मार्गदर्शनाखाली एक आठवड्यापासून नियोजन करण्यात आले.खेड्यापाड्यातील नागरिकांना आलापल्ली येथे आणण्यासाठी वाहनांची व्यवस्था करण्यात आली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राकॉचे अहेरी तालुका अध्यक्ष श्रीनिवास विरगोनवार,रायुकाचे अध्यक्ष स्वप्नील श्रीरामवार,नगरसेवक अमोल मुक्कावार,ग्रा प सदस्य मनोज बोलूवार,ग्रा प सदस्य सोमेश्वर रामटेके,सुमित मोतकुरवार,महेश येरावार आदींनी परिश्रम घेतले.भव्य आरोग्य शिबिरात वोक्हार्ट हॉस्पिटल,दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था,संचालित आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय,सावंगी (मेघे),लॉड्स काली एमल मेमोरियल हॉस्पिटल हेडरी,लॉड्स मेंटल्स अँड एनर्जी लिमिटेड सुरजागड आणि सलूजा नर्सिंग होम आलापल्ली येथील तज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी केली.यात रक्तदाब,ब्लड शुगर,किडनीचे आजार, हृदयरोग, डोळ्यांचे सर्व आजार,हर्निया अंगावरील गाठी,आतड्याचे आजार, मुतखडयाचे आजार,कान, नाक,घसा, मणक्याचे आजार,खाज,दमा, मानसिक रोग,दातांचे आजार कॅन्सर रुग्ण तसेच मानसिक आजाराचे रुग्ण तपासणी करण्यात आले. तर गंभीर आजार असलेल्या रुग्णांना मोठ्या नामांकित रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात येणार आहे.

योग विद्या धाम ऊर्जानगर (चंद्रपूर) तर्फे रथसप्तमी निमित्त सामुहिक सूर्यनमस्कार

ऊर्जानगर । प्रतिनिधी

दिनांक १६ फेब्रुवारी रोजी रथसप्तमी चे औचित्य साधून योग विद्या धाम ऊर्जानगर (चंद्रपूर) तर्फे सामुहिक सूर्यनमस्कार घेण्यात आले. योग विद्या धाम ऊर्जानगर हि संस्था योग विद्या गुरुकुल नाशिक संलग्न असून योग क्षेत्रात अग्रगण्य आहे आणि योगाभ्यासातिल विविध शासनमान्य अभ्यासक्रम चालवते. हा कार्यक्रम अधिकारी मनोरंजन केंद्राच्या मोकळ्या पटांगणात सकाळी ७:०० ते ८:०० या कालावधीत घेण्यात आला. सामुहिक सूर्यनमस्कारासाठी एकूण ३२ साधकांनी आपला सहभाग नोंदवला.

प्रत्येक साधकाने प्रत्येकी १४ असे एकूण ४४८ सूर्यनमस्कार यानिमित्ताने घेण्यात आले.तत्पूर्वी नवीन साधकांना पूर्वतयारी व सूर्यनमस्कार साधना करता यावी याकरिता दिनांक ०५ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी पर्यंत योग शिक्षक विशाल फिसके यांनी शाखेतर्फे नि:शुल्क सूर्यनमस्कार साधना वर्ग पार पाडला. हा कार्यक्रमात रथसप्तमी निमित्त माहिती शेखर सरकार यांनी दिली तसेच विशाल फिसके व साधना चव्हान यांनी उपस्थित साधकांचे सामुहिक सूर्यनमस्कार घेतले. या कार्यक्रमाच्या आयोजन, नियोजन व यशस्वितेसाठी शाखेचे सर्व योगशिक्षक शेखर सरकार, विशाल फिसके, अमोल जतकर, राहुल महाजन, विक्रांत सूर्यवंशी, अर्चना बनसोड, कोमल भागवत, नेहा महाजन, साधना चव्हान, पूनम वरुडकर, ममता भोंगाडे, रश्मी पाटोळे यांनी आपले बहुमुल्य योगदान दिले. योग विद्या धाम ऊर्जानगर शाखेतर्फे निरंतर योग प्रवेश, योग परिचय, योग संजीवन, सूर्यनमस्कार साधना, बाल संस्कार, उंची संवर्धन व योग सराव वर्ग वर्षभर घेण्यात येतात.

विद्यार्थ्यांनी बालवयापासून जिज्ञासू वृत्ती जोपासावी–दिनेश चोखारे

चंद्रपूर । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांमध्ये अंतराळविषयक ज्ञानात भर पडावी, विज्ञानाची आवड निर्माण व्हावी, यासाठी बालवयापासून जिज्ञासू वृत्ती जोपासावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ मर्यादित, महाराष्ट्र संचालक तथा माजी सभापती तसेच काँग्रेस नेते दिनेशभाऊ चोखारे यांनी केले

नवरत्न स्पर्धा तसेच विज्ञान प्रदर्शनात चमकणाऱ्या जिल्हा परिषद शाळांमधील ३० विद्यार्थ्यांची कर्नाटक राज्यातील बंगलुरु येथील इस्रो प्रकल्प पाहण्यासाठी निवड करण्यात आली होती. इस्रो दौऱ्यावरून परत आलेल्या बल्लारपूर तालुक्यातील विद्यार्थ्यांचे कौतुक करताना ते बोलत होते. यावेळी बल्लारपूर तालुक्यातील कवडजई येथील कु. ऋतुजा गोपीचंद पेंदोर आणि जुनी दहेली येथील सक्षम राजेंद्र गोंधळी या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष गोवींदा पाटील उपरे, ओबीसी नेते सचिन राजूरकर, सामाजिक कार्यकर्त्या नाजुका हनुमान आलाम याची उपस्थित होती.जिल्हा परिषद शाळांमधील ३० विद्यार्थ्यांची इस्रो दौऱ्यासाठी निवड करण्यात आली होती. यात बल्लारपूर तालुक्यातील कवडजई येथील कर्मवीर विद्यालय, येनबोडी येथे वर्ग ८ विला शकत असलेली कु. ऋतुजा गोपीचंद पेंदोर आणि जुनी दहेली येथील श्री. बालाजी हायस्कुल बामणी दुधोली येथे वर्ग ९ वी मध्ये शिकत असलेला सक्षम राजेंद्र गोंधळी या दोघांचाही कौतुक व भेट वस्तू देऊन सत्कार करण्यात आला.दोघांनीही आपल्या यशाचे श्रेय शिक्षकवृंद तसेच आई वडिलांना दिले आहे.

श्री छत्रपती शिवस्वराज्य सेवा संस्था आष्टीचा कार्यक्रम ना.राजे धर्मरावबाबा आत्राम यांच्या उपस्थितीत संपन्न होणार

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील श्री छत्रपती शिवस्वराज्य सेवा संस्थेच्या शिवजयंतीच्या निमित्ताने रांगोळी स्पर्धा घेण्यात येणार असून ही स्पर्धा ना. धर्मरावबाबा आत्राम यांच्या उपस्थितीत सम्पन्न होत आहे.दि १८ फेब्रुवारी ला सायंकाळी ५.०० वाजता महाराष्ट्र राज्य अन्न व औषध प्रशासन मंत्री ना. धर्मरावबाबा आत्राम हे या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहणार आहेत त्यांचे सह राष्ट्रवादी काँग्रेस गडचिरोली महीला अध्यक्ष शाईन हकीम, उपाध्यक्ष पुष्पा व्यंकटी बुर्ले, आदिवासी सेल जिल्हा अध्यक्ष संतोष सोयाम, विधानसभा अध्यक्ष तथा जिल्हा उपाध्यक्ष युवा राष्ट्रवादी काँग्रेस प्रणय बुर्ले जिल्हा उपाध्यक्ष नोमेश जुवारे जिल्हा संघटक हेमंत भाकरे, गोलू पोटवार, जिल्हा उपाध्यक्ष नेमाजी घोगरे, शहर अध्यक्ष राहुल डांगे, जिल्हा सरचिटणीस हरिश मंगाम, आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.तरी परिसरातील समस्त नागरिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन श्री छत्रपती शिवस्वराज्य सेवा संस्था आष्टी च्या वतीने करण्यात आले आहे.

सामुहिक विवाह सोहळ्या मध्ये भाग घेणारे दाम्पत्य

चंद्रपूर–विवाह सोहळ्यामध्ये अनाठायी खर्च करणे, त्यासाठी प्रसंगी कर्जबाजारी होणे व त्यामुळे आर्थिक समस्येच्या खाईत लोटले जाणे हे प्रकार टाळण्यासाठी महाराष्ट्रातील अनुसूचित जाती (नवबौध्दांसह) विमुक्त जाती, भटक्या जमाती (धनगर व वंजारीसह) विशेष मागास प्रवर्गातील आर्थिक कमकुवत असलेल्या मागासवर्गीय कुटुंबातील सामुहिक विवाह सोहळ्यामध्ये सहभागी होऊन विवाह करणा-या जोडप्यांना शासन निर्णय २ फेब्रुवारी २०१९ अन्वये कन्यादान योजना सुरू करण्यात आली आहे.सदर योजनेंतर्गत सामूहिक विवाह सोहळयामध्ये भाग घेणा-या मागासवर्गीय दाम्पत्यासाठी वस्तुरुपाने २० हजार रुपये तसेच स्वयंसेवी संस्थेस प्रत्येक जोडप्यामागे ४ हजार रुपये अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली आहे, असे समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त बाबासाहेब देशमुख यांनी कळविले आहे.

गरिबीला दोष न देता मेहनत केल्यास, यश नक्की मिळेल–ठाणेदार वाघमारे

कोरपना । प्रतिनिधी

सध्याचे युग हे स्पर्धेचे आहे. एमपीएससी व यूपीएससीच्या माध्यमातून विद्यार्थी जीवनात यशस्वी होऊ शकतो. गरिबीला दोष न देता विद्यार्थ्यांनी प्रचंड मेहनत केल्यास इच्छाशक्तीच्या भरवशावर यश मिळवता येते असे प्रतिपादन गडचांदूर येथील पोलीस निरीक्षक राजकमल वाघमारे यांनी केले.

गडचांदूर शिक्षण प्रसारक मंडळ, गडचांदूर द्वारा संचालित महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालय, गडचांदूर येथे बारावीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रफुल्ल माहुरे उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी म्हणून एमसीव्हीसी विभागाच्या प्रमुख प्रा. आरजु आगलावे, प्रा. नंदा भोयर उपस्थित होत्या. यावेळी बारावीच्या विद्यार्थ्यांनी आपली मनोगत व्यक्त केली.कार्यक्रमाचे संचालन प्रा. विवेक पाल यांनी केले. प्रास्ताविक प्रा. आशिष देरकर यांनी केले तर आभार प्रा. माधुरी पेटकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता सर्व प्राध्यापक विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

गाव चलो अभियानाला नागरिकांचा प्रतिसाद

भाजप कार्यकर्त्यांनी दिली शासकीय योजनांची माहिती

गोंडपिपरी । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून चंद्रपूर जिल्ह्यात जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या मार्गदर्शनात गोंडपिपरी तालुक्यातील तोहगाव सह विविध गावात नागरिकांना राज्य व केंद्र शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती दि (१५) बुधवारी देण्यात आली.

या अभियानात अंत्योदय योजना, सशक्त शेतकरी समृद्ध भारत, सबका साथ सबका विकास, पायाभूत सुविधांचा अभूतपूर्व विकास आरोग्य धनसंपदा, महिला शक्ती नवी गती ,राज्यातील पायाभूत सुविधांचा विकास सामाजिक न्याय,कृषी कल्याण गड किल्ल्यांचे व तीर्थक्षेत्रांचे संवर्धन आदीं योजनांची माहिती देण्यात आली .नागरिकांनी या योजनांचा लाभ घ्यावा असे आव्हान नगरपंचायत गोंडपिपरी नगरसेवक राकेशभाऊ पून, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष बंडू गौरकार गणेश डहाळे, प्रकाश रापलवार यांच्यासह भाजपचे बूथ प्रमुखयोगेश खामनकर , राहूल खोब्रागडे, अतूल बूक्कावार , बंडू दुर्गे , संदिप बूक्कावार , अजय जिरकूंटवार , सौरभ मोरे , आशिष मोरे, रमेश राऊत , यश उत्तरवार , गणपत धोटे , देवराव टेकाम ,संजय धोटे , प्रदिप निवलकर व पदाधिकारी-कार्यकर्ते सक्रियतेने या अभियानात सहभागी झाले होते.

शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्यावर आधारीत वेशभूषा स्पर्धा

शिवजयंती उत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे मनपाचे आवाहन

चंद्रपूर । प्रतिनिधी

चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती अतिशय उत्साहाने आणि मोठ्या प्रमाणात साजरी करण्याच्या दृष्टीने छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्यावर आधारीत वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेत शहरातील सर्व शासकीय व खाजगी शाळेतील विद्यार्थी सहभागी होऊ शकतील. आकर्षक वेशभूषा करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीसे दिली जाणार आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांनी स्थापन केलेले स्वराज्य हा भारताच्या इतिहासातील एक दैदीप्यमान अध्याय आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय ध्येयधोरणे आजही आपल्या सर्वासाठी प्रेरणादायी व मार्गदर्शक आहेत. त्यामुळे राज्यातील सर्वांनी ही शिवजयंती अतिशय उत्साहाने आणि मोठ्या प्रमाणात साजरी करण्याचे सांस्कृतिक विभागाचे निर्देश आहेत. त्यानुसार चंद्रपूर मनपाद्वारे सदर कार्यक्रमाचे नियोजन केले जात आहे. या स्पर्धेत शहरातील सर्व शाळांचे वर्ग १ ते १० चे विद्यार्थी सहभागी होऊ शकतील. सहभागी विद्यार्थ्यांमधून उत्कृष्ट वेशभूषा धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीसे देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे सहभागी प्रत्येक शाळेला स्कुल बॅग, वॉटर बॉटल, कंपास या स्वरूपाची ३ बक्षिसे सुद्धा दिली जाणार आहेत. अँड्रॉइड टॅब, सायकल, ट्रॉली बॅग असे मोठ्या बक्षिसांचे स्वरूप असून प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला प्रोत्साहनपर बक्षीससुद्धा देण्यात येणार आहे. स्पर्धेतील सर्व सहभागी विद्यार्थ्यांना १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता गिरनार चौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभूषा करून उपस्थित राहायचे आहे.राज्य शासनामार्फत दरवर्षी दिनांक १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची शासकीय कार्यालयात जयंती साजरी करण्यात येते. या दिवसाचे औचित्य साधून या थोरपुरुषांचे ज्या ज्या ठिकाणी पुतळे/स्मारके आहेत, तेथे यावर्षी देखील छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात यावी, असे निर्देशही राज्य शासनाने दिले आहेत. त्यामुळे यंदा शिवजयंती कार्यक्रमाचे स्वरूप मोठे असून यात सांस्कृतिक कार्यक्रम सुद्धा सादर केले जाणार आहेत



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .